## तसेच आहे

साधारणपणे
बासष्ट वर्षांपूर्वी
माझा जन्म झाला
नंतर
एका घरात मोठा झालो
(ते घर अजून तसेच आहे)
नंतर
प्राथमिक शाळेत गेलो
शाळेच्या आवारात
आंब्याची झाडे होती
(ती अजून तशीच आहेत)
नंतर माध्यमिक शाळेत गेलो
शाळेच्या शेजारी मोठा स्वीमिंग टँक होता
(तो अजून तसाच आहे)
नंतर
कॉलेजात गेलो
कॉलेजशेजारी इराण्याचे हॉटेल होते
(ते अजून तसेच आहे)
नंतर
वकील झालो
कोर्टाशेजारी रेल्वे लाईन होती
(ती अजून तशीच आहे)
नंतर
नंतर

**मिलिंद सहस्रबुद्धे**
पुणे
smilind.adv@gmail.com

**भरत यादव... (पृष्ठ क्र. ४८ वरून)**

विकृत मानसिकतेने पाहाणाऱ्या बमोंनी छत्रपती संभाजी महाराजांवरही तिरस्काराचे जहरी फुत्कार या इतिहासद्रोही बखरीच्या माध्यमातून कसे सोडले आहेत, हे स्पष्ट करताना आह 'पुरंदरे आणि संभाजी महाराज' या प्रकरणात लिहितात, ''संभाजीमहाराज मुघलांकडे का गेले, हे इतिहासाला खरोखरच नेमकेपणाने ठाऊक नाही, अशा स्थितीत ते भाबडेपणाने तरी गेले असतील किंवा दुष्टपणाने तरी गेले असतील, असे दोन पर्याय मांडणे, याचा अर्थच पुरंदरेंनी संभाजीराजांचे प्रतिमाहनन करण्याचा ठाम निर्धार केला आहे. एवढ्या कर्तबगार महापुरुषाविषयी इतकी कुत्सित भावना पुरंदरे बाळगतात, कारण मंत्र्यांवर कोणताही ठपका ठेवण्याची त्यांची इच्छा नाही. संभाजीराजे भाबडेपणाने मुघलांकडे गेले असतील, तर ती त्यांची अपरिपक्वता ठरते. स्वाभाविकच, ते पुढच्या काळात छत्रपती बनण्यास पात्र नव्हते, असा संदेश देता येतो. ते दुष्टपणाने गेले असतील, तर ते सरळ सरळ स्वराज्यद्रोही ठरतात आणि मग तर भावी काळात छत्रपती होण्याच्या दृष्टीने त्यांची वाटच बंद करता येते. मानले पाहिजे पुरंदरेंच्या बुद्धिचातुर्याला आणि त्यांच्या संभाजीद्वेषालाही!''

'पुरंदरेंची इतिहासद्रोही बखर'मधून अशी असंख्य उदाहरणे संदर्भासहित स्पष्ट करत इतिहासलेखनातील लांडीलबाडी झोडून काढल्याचे जाणवते, आहंनी उपस्थित केलेल्या बिनतोड आक्षेपांबाबतचा खुलासा वा प्रतिवाद करण्याचे नैतिक धैर्य आजपावेतो बमो अथवा त्यांचे समर्थक दाखवू शकलेले नाहीत. यावरुन बमोंची शिवचरित्राकडे पाहाण्याची मानसिकता कशी पूर्वग्रहदूषित व हिणकस होती व आहे यावर एकप्रकारे मोहरच उमटली आहे.

●

---

पुरंदरेंची इतिहासद्रोही बखर, आ. ह. साळुंखे, लोकायत प्रकाशन, सातारा, पृ. १७६, मूल्य १८० रु.